महाराष्ट्र शासन
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,
मालजीपुरा, स्टेशन रोड, औरंगाबाद - ४३१००१
Email:- aurangabadrojgar@gmail.com
Website:- www.rojgar.mahaswayam.gov.in ☎ ०२४०- २९५४८५९

जा.क्र.जिकौविरोवउमाकेऔ/कौवि/TP-TC/२०२२/१५६८-१६१० दिनांक:-३१/०५/२०२२

इमेलद्वारे / हस्ते देय

प्रति,

१. मा. प्र-कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद-४३१००४
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय औरंगाबाद - ४३१००५
३. अध्यक्ष, मराठवाडा ऑटो क्लस्टर, औरंगाबाद - ४३११३६
४. अध्यक्ष, देवगिरी इलेक्ट्रॉनिक क्लस्टर, औरंगाबाद - ४३१००५
५. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, औरंगाबाद - ४३११३६
६. संचालक, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स ॲंड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, औरंगाबाद - ४३१००४
७. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद - ४३१००६

विषय:- जिल्हा कौशल्य विकास आराखडा (DSDP) अंतर्गत नमूद अल्पमुदतीचे कौशल्य विकास प्रशिक्षण राबविण्याकरिता कौशल्य प्रशिक्षण संस्था (TP आणि TC) म्हणून स्कील इंडिया पोर्टल वरती नोंदणी करणे बाबत

संदर्भ:- १) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक कौविउ २०१५ / प्र.क्र. १२२ रोस्वरो-१, दिनांक २ सप्टेंबर, २०१५.
२) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक कौविउ २०१९ / प्र.क्र.९६ / अभियान-१, दिनांक: २७ मे, २०२०

राज्यामध्ये कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागांतर्गत "महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS)" या स्वतंत्र संस्थेची दि. १५/०२/२०११ रोजी स्थापना करण्यात आली आहे. राज्यस्तरावर सदर संस्था कौशल्य विकास योजनेकरिता "नोडल एजन्सी" म्हणून कार्यरत आहे. जिल्ह्यामध्ये संदर्भीय शासन निर्णय व परिपत्रकानुसार निश्चित केलेल्या कार्यकक्षेत अधिन राहून कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यासाठी कौशल्य विकास जिल्हा कार्यकारी समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. या समितीच्या मान्यतेने जिल्हा कौशल्य विकास आराखडा तयार करण्यात येतो आणि मंजूर वार्षिक आराखड्याच्या आधारे जिल्ह्यामध्ये राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनाअंतर्गत कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतात.

त्यास अनुसरून, आपल्याकडे / आपल्या अधिनस्त संस्थेकडे जिल्ह्याची उच्च मागणी असलेल्या क्षेत्रातील (Skill Gap Study अन्वये) निकड पाहता जिल्हा कौशल्य विकास आराखडा (DSDP) अंतर्गत नमुद अल्पमुदतीचे कौशल्य विकास प्रशिक्षण अभ्यासक्रम औरंगाबाद जिल्हामध्ये दर्जेदार पद्धतीने राबविण्याकरिता आपल्या संस्थेकडील उपलब्ध संसाधने, पायाभुत सुविधा आणि प्रमाणित प्रशिक्षक इ. बाबी विचारात घेऊन, आपली संस्था कौशल्य प्रशिक्षण संस्था (TP / TC) म्हणून सूचीबद्ध झाल्यास विविध योजनेंतर्गत कौशल्य प्रशिक्षण राबवून जिल्ह्यातील उमेदवारांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे शक्य होईल. सूचीबद्ध प्रशिक्षण संस्थेस विहित अटी आणि शर्तीच्या अधीन राहून प्रती तास प्रती उमेदवार या दराने शासनामार्फत प्रशिक्षण शुल्क अदा करण्यात येते.

कृ. मा. प.

यास्तव, वरीलप्रमाणे कौशल्य विकास अभ्यासक्रम राबविण्याकरिता, आपल्या संस्थेची कौशल्य प्रशिक्षण संस्था (Training Partner आणि Training Centre) म्हणून सुचीबद्धतेकरीता (www.skillindia.gov.in) स्कील इंडियापोर्टल वरती नोंदणी करावी.

(सुनील चव्हाण, भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
कौशल्य विकास जिल्हा कार्यकारी समिती,
औरंगाबाद

प्रत कार्यवाहीस्तव -

१. संबधित विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
२. प्राचार्य, शासकीय / खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद (सर्व)
३. प्राचार्य, शासकीय / खाजगी तंत्रनिकेतन महाविद्यालय, औरंगाबाद (सर्व)
४. प्राचार्य, शासकीय / खाजगी औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद (सर्व)
५. हॉटेल व्यवस्थापन आणि केटरिंग तंत्रज्ञान संस्था, औरंगाबाद (सर्व)
६. वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, औरंगाबाद (सर्व)
७. दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य विकास योजनेंतर्गत नोंदणीकृत संस्था (सर्व)

पृष्ठांकण पत्र जा.क्र.:विकाऔ/शिक्षण/२०२२/ 1945
दिनांक : 7 JUN 2022

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्राचे अनुषंगाने या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/अशासकीय/अनुदानित/विनाअनुदानित पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी, व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या संस्था (औरंगाबाद जिल्हा) यांना कळविण्यात येते की, जिल्हा कौशल्य विकास आराखडा (DSDP) अंतर्गत नमूद अल्पमुदतीचे कौशल्य विकास प्रशिक्षण राबविण्याकरिता कौशल्य प्रशिक्षण संस्था (TP आणि TC) म्हणून स्कील इंडिया पोर्टल वरती नोंदणी करणेबाबत (संदर्भीय पत्राची प्रत अवलोकनार्थ सोबत जोडली आहे.) त्याअनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास विनाविलंब सादर करण्यात यावा.

(उमेश नागदेवे)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

EDUCATION-2021-22/CERULAR/07062022/18